

# माध्यमविद्या

कोल्हापूर, दि. २६ मार्च २०२४ खासगी वितरणासाठी


# किटकांची भरली शाळा

## शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात प्रदर्शन : विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रसाद यादव, मनिष पोळेकर**

**शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात नुकतीच किटकांची शाळा भरली होती. किटकांची दुनिया पाहण्यासाठी आणि ती समजून घेण्यासाठी अबालवृद्धांसह शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी तुडुंब गर्दी केली होती. सर्वात छोट्या किटकापासून ते सर्वात मोठ्या किटकापर्यंतच्या जवळपास साडेचारशे प्रजातींचे २२०० किटकांचे प्रदर्शन भरवून विद्यापीठाने किटकांच्या अनोख्या दुनियेची सर्वसमान्यांना ओळख करून दिली. हे प्रदर्शन पाहण्यासाठी तीन दिवस खुले होते. या काळात शेकडो विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. विशेषत: सर्वसामान्य नागरिक आणि पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. अनेक शाळांनी सहलींचे आयोजन करत किटकांविषयीही माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. काही पालक आपल्या मुलांना घेऊन प्रदर्शनस्थळी दाखल झाले होते.**



सर्वात लहान फुलपाखरू ब्लू आयमार्क

## लहान आकाराचे फुलपाखरू चर्चेत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्राणीशास्त्र विभागातर्फे भरवण्यात आलेल्या किटकांच्या प्रदर्शनात भारतातील सर्वात लहान असलेल्या ब्लू आयमार्क या फुलपाखराविषयी कुतूहल निर्माण झाले. या प्रर्दशनाला भेट देणाऱ्यांना या फुलपाखराविषयी माहिती जाणून घेण्यासाठी उत्सुकता निर्माण झाली. या छोट्या आकाराच्या फुलपाखराबद्दल प्रदर्शनाच्या ठिकाणी चांगलीच चर्चा रंगली होती.

ब्लू आयमार्क या फुलपाखराला मराठीमध्ये निळवंत किंवा नीलपंख असे म्हणतात. अपृष्ठवंशीय किटक प्रकारातील हा एक महत्वाचा किटक आहे. हे फुलपाखरू श्रीलंकेत आढळते शिवाय भारताच्या महाराष्ट्र, दक्षिण भारत व पूर्व समुद्र किनारपट्टीच्या क्षेत्रात आढळते. पश्चिम घाटातील सह्याद्री पर्वतरांगेमध्ये याचे वास्तव्य आहे. त्याच्या पंखावर निळ्या रंगाच्या चमकदार खुणा असतात. **(वृत्त पान २ वर)**

## ॲटलास मॉथ आकर्षणाचे केंद्र!

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने तीन दिवसीय किटक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी फुलपाखरांच्या प्रदर्शनात खवले पंखी गणातील ॲटलास मॉथ हा किटक प्रेक्षकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला होता.

हे प्रदर्शन १३ ते १५ मार्च दरम्यान प्राणीशास्त्र विभागात सकाळी साडेदहा ते सायंकाळी सहा या वेळेत झाले. या प्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. या उद्घाटनास प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. ए. देशमुख, प्रदर्शनाचे समन्वयक प्रा. डॉ. एस. एम. गायकवाड आदी उपस्थित होते.

या प्रदर्शनात खवले पंखी गणातील ॲटलास मॉथ हा किटक सर्वांच्या कौतुकाचा विषय होता. हा किटक आकाराने सर्वाधिक मोठा होता. तो विविध रंगात पहावयास मिळतो. त्याचे पंख त्रिकोणी आकाराचे असतात. या किटकात मादीचा आकार हा नर किटकांपेक्षा मोठा असतो. एक मादी १५० ते २०० अंडी देते. त्यांचा जगण्याचा कालावधी साधारणत: २५ ते ३० दिवसांचा असतो.

या प्रदर्शनाद्वारे किटकांचे महत्त्व, त्यांचे स्थान, विविध प्रकार दाखवून 'किटक वाचवा' ही मोहीम प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने राबवली गेली. प्रदर्शनास विविध शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक वर्ग तसेच सामान्य नागरिक यांनी भेट देऊन किटकांची दुनिया अनुभवली. तिन्ही दिवस प्रदर्शन पाहण्यास लोकांची मोठी गर्दी होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात आयोजित किटक प्रदर्शनात सर्वात मोठा ॲटलास मॉथ हा किटक.**

निसर्गात समतोल राखण्यासाठी किटक हा उपयुक्त प्राणी आहे व अन्नसाखळीत किटकांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. अन्नसाखळीतील प्राथमिक घटक हे किटक आहेत. अन्नसाखळी अबाधित राहण्यासाठी किटक फार महत्त्वाची भूमिका बजावतात. किटकांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, किटकांचे संवर्धन केले नाही तर सजीवसृष्टी धोक्यात येऊ शकते.

**-प्रा. डॉ. सुनिल गायकवाड**

समन्वयक, किटक प्रदर्शन

## किटक वाचवा...जैवविविधता वाचवा!

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात आयोजित किटक प्रदर्शनाने जैवविविधता वाचवण्याचा संदेश मिळाला आहे. असे प्रदर्शन आम्ही प्रथमच पाहत आहोत, अशा भावना प्रदर्शनाला भेट दिलेल्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.



निसर्गात आपण किटक,किडे पाहत असतो,पण दुर्मिळ असे कीटक पाहण्याची संधी मला पहिल्यांदा मिळाली.

**-ओंकार उपाध्ये**, इंग्रजी अधिविभाग



वाढत्या यांत्रिकीकरणामुळे जैवविविधतेचा ऱ्हास होत आहे. किटक वाचवा! जैवविविधता वाचवा! खूप चांगला व स्तुत्य उपक्रम.

**-ऋषिकेश गुरव**, रसायनशास्त्र विभाग